# सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रत्नागिरी

यांचे कार्यालय,२ रा मजला,रेव्हियुन्यु डिपा.सो.इमारत,कलेक्टर ऑफीस आवार,रत्नागिरी,

.....................................................१९५८...१९५९.........

जा.क्र सनिर/प्र१/रोशनासहगृहसं/काक७७(अ)/२०१७

दिनांक .०७.१२.२०१७

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्तीचा आदेश

वाचा - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)

वाचले – १.श्रीम.सनोबर अझहर फकीर अध्यक्ष, रोशना सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या..उदयमनगर,रत्नागिरी यांचेकडील दि. २८.०८.२०१७ रोजीचे राजीनामा पत्र

२.श्रीम.नाझिया हरीस,सदस्य, रोशना सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या..उदयमनगर,रत्नागिरी यांचेकडील दि. २८.०८.२०१७ रोजीचे राजीनामा पत्र

३.श्रीम.आसमा म.मुजावर,सदस्य,रोशना सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या..उदयमनगर,रत्नागिरी यांचेकडील दि. २८.०८.२०१७ रोजीचे राजीनामा पत्र

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतुदीनुसार रोशना सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या..उदयमनगर,रत्नागिरी या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे तरतुदीनुसार झाली असून तीचा नोंदणी क्रमांक आरटीजी/(आरटीजी)/एचएसजी/(टीसी)/२२९८/सन २०१६,दिनांक १६.०२.२०१६ आहे. यापुढे सदर संस्थेचा उल्लेख उक्त संस्था असा करण्यात आला आहे. आणि,

ज्याअर्थी संस्थेच्या एकूण संचालक मंडळांची संख्या ११ असून त्यापैकी ०७ सदस्य सध्या संचालक मंडळ सदस्य म्हणून कार्यरत आहेत ,त्यापैकी २ सदस्यांनी संस्थेचे कामकाज करण्यास इच्छुक नसल्याने त्यांनी संचालक पदाचा राजीनामा संस्था अध्यक्ष यांचेकडे दिला आहे तसेच संस्था अध्यक्ष यांनी अध्यक्ष पदाचा व समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला असून समितीने आपले कामकाज करणे थांबविले आहे.त्यामुळे व्यवस्थापक समिती अल्पमतात आली असून त्यामुळे व्यवस्थापकीय पोकळी निर्माण झाली आहे. आणि त्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळितरित्या चालू राहणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये संस्थेवर प्राधिकृत अधिकारी मंडळ नेमणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी,मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये, मला प्राप्त अधिकारानुसार मी एस.डी.तोडणकर,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,रत्नागिरी. आदेश देतो की, रोशना अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या..उदयमनगर,रत्नागिरी या संस्थेच्या समितीने आपले पदाचे राजीनामे दिले असून कामकाज करणे थांबविले आहे. त्यामुळे व्यवस्थापकीय पोकळी निर्माण झाली आहे, या कारणास्तव संस्थेवर ६ महिने मुदतीकरता श्री.संतोषकुमार शिवाजी पाटील,मुख्यलिपीक,अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रत्नागिरी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

वरील प्राधिकृत अधिकारी यांनी नवीन समितीच्या निवडणूकीची व्यवस्था करुन संस्थेचा ताबा नवीन समितीकडे सोपविण्याची कार्यवाही करावी अथवा संस्थेच्या हिताचे दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी.सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक ०७.१२.२०१७ रोजी दिला असे.

स्थळ - रत्नागिरी

दिनांक - ०७.१२.२०१७

(एस.डी.तोडणकर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,रत्नागिरी.

प्रत -

श्री.संतोषकुमार शिवाजी पाटील,मुख्यलिपीक,अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रत्नागिरी तथा प्राधिकृत अधिकारी रोशना सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या..उदयमनगर,रत्नागिरी

२/- त्यांनी उक्त संस्थेच्या दप्तराचा व जायदादींचा रितसर ताबा घेउन दैनंदिन कामकाज सांभाळावे व तसा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.तसेच प्राधिकृत अधिकारी कालावधीत संस्थेची निवडणूक घेवून नवनिर्वाचित समितीकडे संस्थेचे कामकाज सुपूर्त करावयाचे आहे.

प्रत माहितीसाठी

१.माजी चेअरमन/व्यवस्थापक रोशना सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या..उदयमनगर,रत्नागिरी

२/- यांनी संस्थेच्या दप्तराचा व जायदादीचा ताबा प्राधिकृत अधिकारी यांचेकडे त्वरीत सुपूर्त करावा.

२.मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,रत्नागिरी

३.मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था रत्नागिरी यांना सविनय सादर

४.मा.शाखाधिकारी रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., रत्नागिरी शाखा शिवाजीनगर,रत्नागिरी.

(एस.डी.तोडणकर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,रत्नागिरी.